विभागीय / जिल्हा / तालुका क्रीडा संकुल अनुदान मर्यादा सुधारित करण्याबाबत व त्यासंबंधीच्या अटी शर्ती / मार्गदर्शक तत्वांबाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः राक्रीधो-२०१९/ प्र.क्र. ९२/क्रियुसे-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२
दिनांक :- २३ मार्च, २०२२

वाचा:-

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक राक्रीधो २००३/प्र.क्र. ११/क्रीयुसे-१, दि. २६.३.२००३
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक राक्रीधो-२००३/प्र.क्र. ११/क्रीयुसे-१, दि. १६.१.२००४
३) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक राक्रीधो-२००३/प्र.क्र. ११/क्रीयुसे-१, दि. १६.६.२००४
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक राक्रीधो-२००३/प्र.क्र.११/क्रीयुसे-१, दि. १९.०९.२००५
५) शासन शुद्धिपत्रक्र क्रमांक राक्रीधो-२००३/ प्र.क्र. ११/ क्रीयुसे-१, दिनांक ७.१२.२००५.
६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. राक्रीधो-२००९/प्र.क्र. २५/०९/क्रीयुसे-१, दि. २१.०३.२००९
७) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-२०१२/प्र.क्र.२२२/१२/क्रीयुसे-१, दि. ०४.०६.२०१४
८) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. बैठक-२०१५/प्र.क्र. ६५/क्रीयुसे-१, दि. ०२.०९.२०१५
९) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-३०२०/प्र.क्र.१२५/क्रीयुसे-१, दि. ३१.०८.२०२०
१०) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक राक्रीधो-२७२१/प्र.क्र.१६५/क्रीयुसे-१, दि. २२.११.२०२१
११) मंत्रिमंडळाच्या दि. २०.०१.२०२२ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त

प्रस्तावना:-

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण -२००१ नुसार महाराष्ट्र स्पोर्टस् इन्फास्ट्रक्चर डेवलपमेंट प्लॅन अंतर्गत राज्यात विभागीय / जिल्हा /तालुका क्रीडा संकुल स्थापन करण्यासंदर्भात संदर्भाधिन क्र. १ येथील शासन निर्णय दि. २६.०३.२००३ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. यानुषंगाने संदर्भ क्र. २ येथील दि.१६.०१.२००४, संदर्भ क्र.३ येथील १६.०६.२००४ व संदर्भ क्र.४ येथील दि.१९.०९.२००५ अन्वये वेळोवेळी आदेश देण्यात आले आहेत.

सदर क्रीडा संकुलांसाठी अनुदान मर्यादा संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय, दि. २६.०३.२००३ अन्वये विभागीय क्रीडा संकुलासाठी रु.१६.०० कोटी, जिल्हा क्रीडा संकुलासाठी रु.४.०० कोटी व तालुका क्रीडा संकुलासाठी रु.२५.०० लक्ष याप्रमाणे विहित करण्यात आली. तसेच सदर संकुलाबाबत सविस्तर आदेश सदर शासन निर्णयान्वये दिले असून संकुलातील क्रीडा सुविधांबाबत तपशिल शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट अ, ब, व क मध्ये व क्रीडा संकुल समिती रचनेबाबत तपशिल परिशिष्ट ड मध्ये दिला आहे.

क्रीडा संकुलांसाठी विहित केलेल्या अनुदान मर्यादेमध्ये सुधारणा करुन संदर्भ क्र. ६ येथील शासन निर्णय, दि.२१.०३.२००९ अन्वये विभागीय क्रीडा संकुलासाठी रु. २४.०० कोटी, जिल्हा क्रीडा संकुलासाठी रु. ८.०० कोटी व तालुका क्रीडा संकुलासाठी रु. १.०० कोटी इतकी अनुदान मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. तसेच संकुलातील क्रीडा सुविधांबाबत तपशिल शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट अ, ब, व क मध्ये दिला आहे.

क्रीडा संकुलांचा सर्वंकष आढावा घेऊन संकुलाबाबत धोरण निश्चित करण्यासाठी संदर्भाधिन क्र. ८ येथील शासन निर्णय दि. **०२.०९.२०१५** अन्वये आयुक्त क्रीडा व युवक सेवा यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तर समिती व उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्या अध्यक्षतेखाली विभागस्तर समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीने शासनास सादर केलेल्या अहवालामध्ये, संकुलात क्रीडा सुविधा निर्मितीकरीता बांधकाम साहित्य व बांधकामाच्या दरात झालेली वाढ, तंत्रज्ञानात झालेला बदल, नवीन जीएसटी प्रणाली व क्रीडा क्षेत्रातील अद्ययावत सुविधा निर्मिती दरात कालानुरुप झालेली वाढ इत्यादी बाबी लक्षात घेऊन क्रीडा संकुलांच्या अनुदान मर्यादेत वाढ करण्याबाबत शिफारस केली असून प्रस्तावित टाईप प्लॅन सादर केला. तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदयांनी खेलो इंडिया गेम्स २०१९ च्या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी क्रीडा संकुलाच्या अनुदान मर्यादेत वाढ करण्यात येईल, असे घोषित केले होते. तसेच राज्याचा सन २०२०-२१ चा अर्थसंकल्प सादर करताना मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांनी क्रीडा संकुलाची अनुदान मर्यादा तालुका क्रीडा संकुल रु. ५.०० कोटी, जिल्हा क्रीडा संकुल रु. २५.०० कोटी व विभागीय क्रीडा संकुल रु. ५०.०० कोटी याप्रमाणे वाढविण्यात येईल, असे घोषित केले आहे. यानुषंगाने क्रीडा संकुलांच्या अनुदान मर्यादेमध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात आला. याबाबत मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सदर अनुदान मर्यादेत सुधारणेबाबतचे आदेश निर्गमित करण्याची तसेच यानुषंगाने अटी व शर्ती, मार्गदर्शक तत्वे विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णयः-**

क्रीडा संकुलांच्या सध्याच्या संदर्भ क्र. ६ येथील शासन निर्णय, दि. २१.०३.२००९ अन्वये विहित केलेल्या अनुदान मर्यादेत सुधारणा करुन अनुदान मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

(१) ज्या विभागीय / जिल्हा / तालुका क्रीडा संकुलांना अद्याप प्रशासकीय मान्यता दिलेली नाही अथवा प्रशासकीय मान्यता दिली आहे, तथापि प्रत्यक्ष बांधकाम सुरु झालेले नाही, अशा क्रीडा संकुलांबाबत अनुदान मर्यादा खालीलप्रमाणे राहील:-

| अ.क्र. | क्रीडा संकुल प्रकार | सध्याची अनुदान मर्यादा (रु.) | सुधारित अनुदान मर्यादा (रु.) |
|---|---|---|---|
| १ | तालुका क्रीडा संकुल | १००.०० लक्ष | ५००.०० लक्ष |
| २ | जिल्हा क्रीडा संकुल | ८००.०० लक्ष | २५००.०० लक्ष |
| ३ | विभागीय क्रीडा संकुल | २४००.०० लक्ष | ५०००.०० लक्ष |

यापुढे विभागीय / जिल्हा / तालुका क्रीडा संकुलांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे अंदाजपत्रक, आराखडे, प्रस्ताव, या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्टातील टाईप प्लॅननुसार राज्य क्रीडा विकास समितीसमोर सादर करण्यात यावे. ज्या क्रीडा संकुलांना यापूर्वीच प्रशासकीय मान्यता दिली आहे, त्यांच्याबाबत सदर टाईप प्लॅन नुसार सुधारित अंदाजपत्रक सादर करावयाचे असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव राज्य क्रीडा विकास समितीसमोर ठेवणे आवश्यक राहील.

(२) ज्या विभागीय / जिल्हा / तालुका क्रीडा संकुलांच्या अंदाजपत्रकास / सुधारित अंदाजपत्रकास यापूर्वीच प्रशासकीय मान्यता दिली असून त्याचे बांधकाम पुर्ण झाले आहे अथवा प्रगतीपथावर आहे/ अपूर्ण अवस्थेत आहे, अशा क्रीडा संकुलांबाबत अनुदान मर्यादा खालीलप्रमाणे राहील:-

| अ.क्र. | क्रीडा संकुल प्रकार | सध्याची अनुदान मर्यादा (रु.) | सुधारित अनुदान मर्यादा (रु.) |
|---|---|---|---|
| १ | तालुका क्रीडा संकुल | १००.०० लक्ष | ३००.०० लक्ष |
| २ | जिल्हा क्रीडा संकुल | ८००.०० लक्ष | १५००.०० लक्ष |
| ३ | विभागीय क्रीडा संकुल | २४००.०० लक्ष | ३०००.०० लक्ष |

सदर क्रीडा संकुलांबाबत यापूर्वी प्रशासकीय मान्यता दिलेल्या अंदाजपत्रकातील / सुधारित अंदाजपत्रकातील ज्या क्रीडा सुविधांची कामे यापूर्वीच पूर्ण झाली आहेत, अशा क्रीडा सुविधांचे अद्ययावतीकरण / विस्तारीकरण / श्रेणीवाढ व बळकटीकरण यासाठी, अतिरिक्त क्रीडा / मुलभूत सुविधा यांचे बांधकाम, नवीन क्रीडा उपकरणे व साहित्य याकरीता वरील अनुदान मर्यादेनुसार अनुदान अनुज्ञेय राहील. सदर अनुदान सद्याच्या अनुदान मर्यादेनुसार मंजूर केलेल्या अनुदानाव्यतिरिक्त राहील.

(३) सदर क्रीडा संकुल अनुदान मर्यादेसंदर्भातील अटी व शर्ती, मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे राहतील:-

१) एका विभागात एक, एका जिल्ह्यात एक व एका तालुक्यात एक याप्रमाणे क्रीडा संकुल उभारता येतील. तथापि, क्रीडा विभागाच्या निधी व्यतिरिक्त महानगरपालिका अथवा अन्य प्राधिकरणामार्फत उभारण्यात येणाऱ्या क्रीडा संकुलांबाबत ही अट लागू राहणार नाही.

२) जिल्ह्यातील ज्या तालुक्यात जिल्हा क्रीडा संकुल उभारण्यात येणार आहे तेथे स्वतंत्र तालुका क्रीडा संकुल उभारण्याऐवजी जिल्हा क्रीडा संकुलात जास्तीत जास्त क्रीडा सुविधा उपलब्ध करता येईल काय यादृष्टीने तपासणी करण्यात यावी व उचित प्रस्ताव सादर करावा.

३) कोणत्याही क्रीडा संकुलासाठी सुयोग्य जमीन उपलब्धता याबाबत प्राथम्याने कार्यवाही करावी. सदर जमीनीच्या सपाटीकरणासाठी अथवा अन्य कोणत्याही कारणासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च अपेक्षित नसल्याची खात्री करण्यात यावी. क्रीडा संकुलासाठी सुयोग्य जमीन उपलब्ध होऊन ती संकुल समितीकडे वर्ग झाल्यानंतर त्या ठिकाणी क्रीडा संकुल उभारण्यासाठी सविस्तर अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन विहित मार्गाने राज्य क्रीडा विकास समितीसमोर सादर करण्यात यावेत. राज्य क्रीडा विकास समितीच्या मान्यतेनंतर प्रशासकीय मान्यतेबाबतचे आदेश शालेय शिक्षण व क्रीडा विभाग स्तरावरुन काढण्यात यावेत. क्रीडा संकुलासाठी प्रत्यक्ष निधी उपलब्ध झाल्यानंतर बांधकामाबाबत कार्यवाही करण्यात यावी.

४) यापूर्वी प्रशासकीय मान्यता देऊन बांधकाम पूर्ण झालेल्या / बांधकाम प्रगतीपथावर किंवा सुरु असलेल्या क्रीडा संकुलांबाबत अतिरिक्त सुविधांचे सविस्तर अंदाजपत्रक सादर करताना सदर क्रीडा संकुलासाठी उपलब्ध जमीनीचे क्षेत्रफळ, बांधकाम झालेले क्षेत्रफळ, सदर क्रीडा संकुलातील पूर्ण झालेल्या अथवा प्रगतीपथावर असलेल्या क्रीडा सुविधा, प्रस्तावित अतिरिक्त क्रीडा / मुलभूत सुविधा व त्यासाठी उपलब्ध जागेचे क्षेत्रफळ इत्यादी विचारात घेऊन अतिरिक्त क्रीडा सुविधांसाठी अंदाजपत्रक/ सुधारित अंदाजपत्रक व आराखडे सादर करण्यात यावेत. सदर क्रीडा संकुलातील सुस्थितीत/ अपुर्णावस्थेत असलेल्या क्रीडा सुविधा पूर्णत: पाडून त्या ठिकाणी नवीन क्रीडा सुविधा उपलब्ध करता येणार नाहीत.

५) राज्यातील सर्व क्रीडा संकुलांमध्ये खेळाडूंना, संघटनांना, स्थानिकांना/ सर्व सामान्य जनतेस प्रवेश देणे तसेच क्रीडा सुविधा वापर करताना अधिकृत राज्य / राष्ट्रीय क्रीडा संघटना, स्थानिक क्रीडा संघटना, आंतरराष्ट्रीय पदक विजेते खेळाडू यांना प्राधान्य देणे, संकुलांमध्ये वेगवेगळ्या खेळांच्या प्रबोधिनी / प्रशिक्षण केंद्रे सुरु करणे यासंदर्भात सर्व संकुलांसाठी समान मार्गदर्शक तत्वे / अटी व शर्ती विहित करण्यासाठी प्रस्ताव क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारे तपासून सादर करावा.

६) क्रीडा संकुलांना राज्य शासनाकडून वेळोवेळी मंजूर केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित कालावधीत संबंधित प्राधिकाऱ्यांकडे संकुल समितीने सादर करणे आवश्यक राहील. या प्रमाणपत्राच्या अनुषंगाने व बांधकामाची प्रगती इत्यादी बाबी विचारात घेऊन राज्य क्रीडा विकास समितीस संकुलास पुढील निधी मंजूरीबाबत निर्णय घेता येईल.

७) राज्यात खेळाचा जास्तीत जास्त प्रसार व्हावा तसेच विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी, या दृष्टीने क्रीडा संकुलांचा वापर करुन घेण्यासाठी क्रीडा संकुलांबाबत शाळा / महाविद्यालये, खाजगी

कंपन्या, खेळ संघटना इत्यादींशी समन्वय (टायअप) करुन स्पर्धांसाठी, शिबिरांसाठी क्रीडा संकुलातील सुविधा उपयोगात आणण्याच्या दृष्टीने तपासणी करुन कार्यवाही करावी.

८) क्रीडा संकुलांचा पूर्ण क्षमतेने वापर होण्यासाठी तसेच तेथील सर्व सुविधा खेळाडूंना व संघटनांना उपलब्ध व्हाव्यात यासाठी विविध स्रोताद्वारे / माध्यमातून संकुल समितीने प्रयत्न करावेत. तसेच क्रीडा संकुलांचा वापर क्लब हाऊस सारखा होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

२. विभागीय / जिल्हा / तालुका क्रीडा संकुले खेळाडूंना / संघटनांना क्रीडा स्पर्धा, सराव इत्यादीसाठी उपलब्ध रहावीत यासाठी क्रीडा संकुल वापराबाबत तत्वे स्वतंत्रपणे ठरविण्यात येतील.

३. क्रीडा संकुलांच्या देखभाल दुरुस्तीसाठी धोरण तसेच क्रीडा संकुल पालकत्व धोरण स्वतंत्रपणे विहित करण्यात येईल.

४. विभागीय / जिल्हा/तालुका क्रीडा संकुल समितीबाबत संदर्भाधिन शासन निर्णयान्वये वेळोवेळी दिलेले आदेश लागू राहतील.

५. सदरचा शासन निर्णय, नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२१५/१४७१ दिनांक १७.०६.२०२१ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.९४६/२०२१/व्यय-५ दिनांक २५.१०.२०२१ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२०३२३१२४१०८६९२१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: CN = Swati Madhukar Nanal, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA
Date: 2022.03.24 12:57:34 +05'30'

**(स्वा.म. नानल)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई
५. मा. राज्यमंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

७. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
८. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचे स्वीय सहायक
९. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
१०.अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
११.अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
१२.मा. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
१३.मा. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
१४.सर्व आयुक्त, महानगरपालिका
१५.सर्व विभागीय आयुक्त,
१६.आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७.सर्व जिल्हाधिकारी
१८. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपरिषद
१९.सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा (क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत)
२०.सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत)
२१.वित्त विभाग (कार्यासन व्यय-५/अर्थसंकल्प-८) मंत्रालय, मुंबई
२२.नियोजन विभाग (कार्यासन-१४११), मंत्रालय, मुंबई
२३.निवड नस्ती (क्रीयुसे-१)

परिशिष्ट - अ

**शासन निर्णय राक्रीधो-२०१९/प्र.क्र.९२/क्रीयुसे-१, दि. २३ मार्च, २०२२ चे सहपत्र**

## विभागीय क्रीडा संकुल- क्रीडा सुविधांचा तपशिल

| अ.क्र. | क्रीडा सुविधा | अंदाजे खर्च | प्रचलित नियमानुसार अनुदान मर्यादा | प्रस्तावित क्रीडा सुविधांचा तपशील | सुधारित नियमानुसार अनुदान मर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| १. | खुले प्रेक्षागृहे -<br>१० लेन्सचा ४०० मी सिंथेटिक ट्रॅक, १०,००० प्रेक्षकांसाठी गॅलरी, (५००० RCC व ५००० मातीचा भराव), पॅव्हेलियन व प्रशासकीय इमारत | ७५०.०० | ७५०.०० | ४०० मी धावनमार्ग व खुले प्रेक्षागृह -<br>१० लेन्सचा ४०० मी सिंथेटिक ट्रॅक, ( सबबेस, नॉन प्लेईंग एरिया, आतील व बाहेरील ड्रेनेजसह ), चेंनलिंक फेन्सिंग, प्रेक्षकांसाठी गॅलरी, पॅव्हेलियन व प्रशासकीय इमारत | ११२९.७० |
| २. | बंदिस्त जलतरण तलाव :-<br>५०x२१ मी. ऑलिम्पिंक साईज डायव्हिंग तलाव, २५x२५x५ उंची फिल्टरेशन प्लॉटसह व चेजिंग रूमसह | ३२३.७५ | ३२३.७५ | जलतरण तलाव :-<br>५० x २१ मी. ऑलिम्पिंक साईज डायव्हिंग तलाव ( डेक एरियासह), ब्लॅलेसिंग टँक (१० x ६ x ४मी.), फिल्टरेशन प्लॉटसह ( २१.५x७ m ), पंप पीटसह ( ६ x ६.८८ x २.७ मी. ) सुरक्षा साहित्यासह, चेजिंग रूम आणि कव्हर प्रेक्षक गॅलरी ( फिक्स चेअर सह), स्टोअररूम सह | ५२१.५० |
| ३. | बंदिस्त प्रेक्षागृह -<br>५०x४०x६८ मी. आकाराचे वुडन / सिंथेटिक फ्लोरिंगसह, ८०० क्षमतेची प्रेक्षक इनडोअर हॉल | ३०६.१५ | ३०५.१५ | बंदिस्त प्रेक्षागृह - (मल्टीपरपज गेम हॉल)<br>५०x४०x१२.५ मी. आकाराचे वुडन / सिंथेटिक फ्लोरिंगसह, दोन्ही बाजूने प्रेक्षक गॅलरी ( ४०० प्रेक्षक x२ ) चेजिंग रूम, ऑफिससह, सिलिंग व वॉल ऑक्स्टिक तसेच पीए सिस्टिम, स्टोअररूम सह | १०६३.१० |
| ४. | सिंथेटिक टर्फ हॉकी मैदान १०१.४० x ६८.००मी | ३२४.०० | ३२४.०० | सिंथेटिक टर्फ हॉकी मैदान ९१.४० x ५५.००मी व इतर सुविधासह ( सबबेस वर्क, बाहेरील ड्रेनेजसह, चेंनलिंक फेन्सिंग, स्प्रिंकलर सिस्टिमसह, सिंथेटिक सरफेस, चेजिंगरूम, स्टोअररूम सह) | ६५७.२५ |
| ५. | विविध खेळाची क्रीडागणे :-<br>फूटबॉल, हॅण्डबॉल, बास्केटबॉल कोर्ट, कबड्डी, खो-खो, टेनिस कोर्ट सरावासाठी ४०० मी सिंडर टॅकसह | १५८.३० | १५८.३० | विविध खेळाची क्रीडागणे :-<br>फूटबॉल, हॅण्डबॉल, बास्केटबॉल सिंथेटिक कोर्ट, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, टेनिस सिंथेटिक कोर्ट, सरावासाठी ४०० मी सिंडर टॅकसह, शुंटीग / आर्चरी रेंज ( साहित्याकरिता शेड व सुरक्षेकरिता बाजूची भिंत सह) इ. तसेच स्थानिक लोकप्रिय असलेल्या खेळांची अन्य मैदाने | ४२०.७६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६. | आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडासाहित्य - उदा. जिम्नॅस्टिक्सची सर्व उपकरणे, ॲथलेटिक्स इलेक्ट्रॉनिक्स स्टॉप वॉचेस, स्विमींग इलेक्ट्रॉनिक टचपॅड, बास्केटबॉल हैड्रॉलिक अपराईट बोर्ड, कुस्ती, कबड्डी, ज्युडो, कराटे व जिम्नॅस्टिक्स मॅटस व समितीस आवश्यक वाटणारे टिकाऊ इतर क्रीडा साहित्य | १५०.०० | १५०.०० | आय.ए.ए.एफ दर्जाचे ॲथलेटिक्स साहित्य आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडासाहित्य - उदा. जिम्नॅस्टिक्सची सर्व उपकरणे, स्विमींग इलेक्ट्रॉनिक टचपॅड, बास्केटबॉल हैड्रॉलिक अपराईट बोर्ड, कुस्ती, कबड्डी, ज्युडो, कराटे व जिम्नॅस्टिक्स मॅटस व समितीस आवश्यक वाटणारे टिकाऊ इतर क्रीडा साहित्य | ५००.०० |
| ६. | मुला- मुलींचे वसतीगृह | १००.०० | १००.०० | मुला- मुलींचे वसतीगृह, ( G+१, G+१, भोजनकक्ष, फर्निचरसह, बेड, चादर, पडदे, बेडशिट, लॉकर्स इ. बाबी विचारात घ्यावात.) | ३४९.५० |
| ७. | - | - | - | | |
| | (अ) क्रीडा संकुलातील पाणी पुरवठा व्यवस्था | २५.०० | २५.०० | (अ) क्रीडा संकुलातील पाणी पुरवठा व्यवस्था | २५.०० |
| | (ब) क्रीडा संकुलातील ड्रेनेज व्यवस्था | २५.०० | २५.०० | (ब) क्रीडा संकुलातील ड्रेनेज व्यवस्था | |
| | (क) क्रीडा संकुलातील विद्युतीकरण | २५.०० | २५.०० | (क) क्रीडा संकुलातील विद्युतीकरण | १००.०० |
| | (ड) क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते | २५.०० | २५.०० | (ड) क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते | ७५.०० |
| | (इ) क्रीडा संकुलाची संरक्षक भिंत | १३७.८० | १३७.८० | (इ) क्रीडा संकुलाची संरक्षक भिंत | ६०.०० |
| | (ई) इतर किरकोळ खर्च | ५०.०० | ५०.०० | (ई) इतर किरकोळ खर्च | १००.०० |
| | **एकूण** | **२४००.००** | **२४००.००** | **एकूण** | **५०००.००** |

**टिप :-** **१.** अधिकारी व कर्मचा-यांचे निवासस्थान, कार्यालये, विश्रामगृह, महत्वाच्या व्यक्तीसाठी विश्रामगृह (VIP. Longe) इ. बांधकामाचा समावेश वरील एकूण बांधकामामध्ये करण्यात यावा.

२ क्रीडा सुविधांचे नविन काम /नुतनिकरण (upgradation) हे त्या-त्या खेळांच्या अद्यावत (norms) नियम व अटी (मापदंड) नुसार करण्यात यावे.

३. एका बाबीवरील शिल्लक निधी, अनुदान मर्यादेत दुस-या बाबीवर खर्च करता येईल.

४. नमूद क्रीडा बांबींच्या व्यतिरिक्त संबंधित विभागात ज्या खेळाची आवड व परंपरा आहे अशा खेळाच्या प्रशिक्षणासाठी क्रीडा सुविधा प्राधान्याने निर्माण करण्यात याव्यात.

५. उपरोक्त बाबींच्या सर्वसाधारण खर्चाच्या रक्कमा दर्शविण्यात आल्या आहेत. सदर सुविधा व खर्च निर्देशित स्वरुपाचा ( indicative ) असुन त्यामध्ये स्थळपरत्वे बदल करता येईल.

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: CN = Swati Madhukar Nanal, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA
Date: 2022.03.24 12:57:53 +05'30'

**(स्वा.म. नानल)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**परिशिष्ट - ब**

**शासन निर्णय राक्रीधो-२०१९/प्र.क्र.९२/क्रीयुसे-१, दि. २३ मार्च, २०२२ चे सहपत्र**

# जिल्हा क्रीडा संकुल-क्रीडा सुविधांचा तपशिल

| अ.क्र. | क्रीडा सुविधा | अंदाजे खर्च | प्रचलित नियमानुसार अनुदान मर्यादा | प्रस्तावित क्रीडा सुविधांचा तपशील | सुधारित नियमानुसार अनुदान मर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| १. | खुले प्रेक्षागृहे - ४०० मी धावनपथ (माती), ५००० प्रेक्षकांसाठी गॅलरी, (२००० RCC व ३००० मातीचा भराव), हॉकी/फूटबॉल मैदान,चेजिंग रूम, क्रीडा साहित्यासाठी जागा | १०५.०० | १०५.०० | ४०० मी धावनमार्ग व खुले प्रेक्षागृह - ९ लेन्सचा ४०० मी. सॅडाविंच टाईप सिंथेटिक ट्रॅक, (सबबेस, नॉन प्लेईंग एरिया, आतील व बाहेरील ड्रेनेजसह ), प्रेक्षकांसाठी गॅलरी, पॅव्हेलियन व प्रशासकीय इमारत, हॉकी / फूटबॉल मैदान, चेजिंग रूम | ७९८.७२ |
| २. | विविध खेळाची क्रीडागणे :- व्हॉलीबॉल, बास्केटबॉलची मैदाने, कबड्डी / खो-खो ची २ मैदाने, लॉन टेनिस व लोकप्रिय असलेल्या खेळांची अन्य मैदाने | ३४.०० | ३४.०० | विविध खेळाची क्रीडागणे :- व्हॉलीबॉल, बास्केटबॉल सिंथेटिक मैदाने, कबड्डी, खो-खो ची २ मैदाने, लॉन टेनिस सिंथेटिक मैदान व लोकप्रिय असलेल्या खेळांची अन्य मैदाने | १६१.३८ |
| ३. | मल्टिजिम, वेटलिफ्टींग, फिजिकल एक्सरसाईज हॉल, फिटनेस सेंटर | २७.०० | २७.०० | मल्टिजिम, वेटलिफ्टींग, फिजिकल एक्सरसाईज हॉल, फिटनेस सेंटर | ५०.०० |
| ४. | जलतरण तलाव :- ८ लेन्ससह २५x२१मी.फिल्टरेशन प्लॉंटसह व चेजिंग रूमसह | ११२.०० | ११२.०० | जलतरण तलाव :- २५ x २१ मी. ऑलिम्पिंक साईज डायव्हिंग तलाव ( डेक एरियासह ), ब्लॅलेसिंग टँक (८ x ५ x ३मी.), फिल्टरेशन प्लॉंटसह ( १५ x ६ m ), पंप पीटसह ( ६ x ६.८८ x २.७ मी. ) स्पर्धा साहित्य आणि सुरक्षा साहित्यासह, चेजिंग रूम आणि कव्हर प्रेक्षक गॅलरी ( फिक्स चेअर सह) | ३४१.०० |
| ५ | इनडोअर हॉल :- (मल्टीपरर्पज गेम हॉल) सागवान लाकडाचे फ्लोरिंग / सिंथेटिक फ्लोरिंग / आर्टिफिशियल फ्लोरिंग / लॉन टेनिस सिंथेटिक फ्लोरिंग व हार्ड कोर्ट, शुंटीग रेंज | १७७.०० | १७७.०० | बंदिस्त प्रेक्षागृह - (मल्टीपरर्पज गेम हॉल) ५०x४०x१२.५ मी. आकाराचे वुडन / सिंथेटिक फ्लोरिंगसह, एका बाजूने प्रेक्षक गॅलरी, चेजिंग रूम, ऑफिससह, सिलिंग व वॉल ऑक्स्टिक तसेच पीए सिस्टिम, स्टोअर रूमसह. | ५२७.०० |
| ६. | मुला- मुलींचे वसतीगृह यामध्ये ३० बेड मुलींसाठी आवश्यक. शक्यतो डॉरमेंटरी टाईप असावे. | ९०.०० | ९०.०० | मुला- मुलींचे वसतीगृह यामध्ये ३० बेड मुलींसाठी आवश्यक. (भोजनकक्ष, फर्निचरसह, बेड, चादर, पडदे, बेडशिट, लॉकर्स इ.बाबी विचारात घ्यावात.) | १८२.५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७. | खेळाचे साहित्य | ७५.०० | ७५.०० | खेळाचे साहित्य | २००.०० |
| | (अ) क्रीडा संकुलातील पाणी पुरवठा व्यवस्था | १५.०० | १५.०० | (अ) क्रीडा संकुलातील पाणी पुरवठा व्यवस्था (अंतर्गत पाणी टाकी, बोअर वेल ) | २५.०० |
| | (ब) क्रीडा संकुलातील ड्रेनेज व्यवस्था | १५.०० | १५.०० | (ब) क्रीडा संकुलातील ड्रेनेज व्यवस्था | |
| | (क) क्रीडा संकुलातील विद्युतीकरण | २०.०० | २०.०० | (क) क्रीडा संकुलातील विद्युतीकरण | ६०.०० |
| | (ड) क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते | १५.०० | १५.०० | (ड) क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते | ३०.०० |
| | (इ) क्रीडा संकुलाची संरक्षक भिंत | ८५.०० | ८५.०० | (इ) क्रीडा संकुलाची संरक्षक भिंत | ५०.०० |
| | (ई) इतर किरकोळ खर्च | २५.०० | २५.०० | (ई) इतर किरकोळ खर्च | ५०.०० |
| | **एकूण** | **८००.००** | **८००.००** | **एकूण** | **२५००.००** |

**टिप :-** **१.** अधिकारी व कर्मचा-यांचे निवासस्थान, कार्यालये, विश्रामगृह, महत्वाच्या व्यक्तीसाठी विश्रामगृह (VIP. Longe) इ. बांधकामाचा समावेश वरील एकूण बांधकामामध्ये करण्यात यावा.

२ क्रीडा सुविधांचे नविन काम /नुतनिकरण (upgradation) हे त्या-त्या खेळांच्या अद्यावत (norms) नियम व अटी (मापदंड) नुसार करण्यात यावे.

३. एका बाबीवरील शिल्लक निधी, अनुदान मर्यादेत दुस-या बाबीवर खर्च करता येईल.

४. नमूद क्रीडा बांबींच्या व्यतिरिक्त संबंधित विभागात ज्या खेळाची आवड व परंपरा आहे अशा खेळाच्या प्रशिक्षणासाठी क्रीडा सुविधा प्राधान्याने निर्माण करण्यात याव्यात.

५. उपरोक्त बाबींच्या सर्वसाधारण खर्चाच्या रक्कमा दर्शविण्यात आल्या आहेत. सदर सुविधा व खर्च निर्देशित स्वरुपाचा ( indicative ) असुन त्यामध्ये स्थळपरत्वे बदल करता येईल.

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: CN = Swati Madhukar Nanal, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA
Date: 2022.03.24 12:58:08 +05'30'

**(स्वा.म. नानल)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**परिशिष्ट - क**

**शासन निर्णय राक्रीधो-२०१९/प्र.क्र.९२/क्रीयुसे-१, दि. २३ मार्च, २०२२ चे सहपत्र**

## तालुका क्रीडा संकुल-क्रीडा सुविधांचा तपशिल

| अ.क्र. | क्रीडा सुविधा | अंदाजे खर्च | प्रचलित नियमानुसार अनुदान मर्यादा | प्रस्तावित क्रीडा सुविधांचा तपशील | सुधारित नियमानुसार अनुदान मर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २०० / ४०० मी धावनपथ | २०.०० | २०.०० | २०० / ४०० मी सिंडर धावनपथ (सबबेस, आतील बाजूने ड्रेनेज व्यवस्थासह) | ४६.२० |
| २. | इनडोअर गेम हॉल | ४०.०० | ४०.०० | बहुउद्देशिय हॉल (जिम्नॅशियम सह)- वुडन / सिंथेटिक फ्लोरिंगसह, चेजिंग रूम, स्टोअर रूम, सिलिंग व वॉल ऑक्स्टिक तसेच पीए सिस्टिम, कार्यालयीन इमारतसह, | १८४.२५ |
| ३. | (अ) खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉलची प्रत्येकी २ मैदाने)<br>(ब) बास्केटबॉल कोर्ट / लॉनटेनिस वा अन्य सुविधा / शुंटीग रेंज | ५.००<br>५.०० | ५.००<br>५.०० | (अ) खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉलची प्रत्येकी २ मैदाने)<br>(ब) बास्केटबॉल कोर्ट / लॉनटेनिस / आर्चरी वा स्थानिक लोकप्रिय खेळाच्या अन्य सुविधा) | ७०.२२ |
| ४. | कार्यालयीन इमारत | ५.०० | ५.०० | - | - |
| ५. | क्रीडा साहित्य | ५.०० | ५.०० | क्रीडा साहित्य | ३०.०० |
| ६. | क्रीडा संकुलातील पाणी पुरवठा व्यवस्था | २.०० | २.०० | क्रीडा संकुलातील पाणी पुरवठा व्यवस्था (अंतर्गत पाणी टाकी, बोअर वेल) | २०.०० |
| ७. | क्रीडा संकुलातील ड्रेनेज व्यवस्था | १.०० | १.०० | क्रीडा संकुलातील ड्रेनेज व्यवस्था | |
| ८. | क्रीडा संकुलातील विद्युतीकरण | २.०० | २.०० | क्रीडा संकुलातील विद्युतीकरण | २०.०० |
| ९. | क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते | १.०० | १.०० | क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते | २४.०० |
| १०. | क्रीडा संकुलाची संरक्षक भिंत | १०.०० | १०.०० | क्रीडा संकुलाची संरक्षक भिंत | ३७.५० |
| ११. | इतर किरकोळ खर्च | ४.०० | ४.०० | इतर किरकोळ खर्च | २०.०० |
| | **एकूण** | **१००.००** | **१००.००** | **एकूण** | **५००.१७** |

**टिप:-** १. अधिकारी व कर्मचा-यांचे निवासस्थान, कार्यालये, विश्रामगृह, महत्वाच्या व्यक्तीसाठी विश्रामगृह (VIP. Longe) इ. बांधकामाचा समावेश वरील एकूण बांधकामामध्ये करण्यात यावा.

२ क्रीडा सुविधांचे नविन काम /नुतनिकरण (upgradation) हे त्या-त्या खेळांच्या अद्यावत (norms) नियम व अटी (मापदंड) नुसार करण्यात यावे.

३. एका बाबीवरील शिल्लक निधी, अनुदान मर्यादेत दुस-या बाबीवर खर्च करता येईल.

४. नमूद क्रीडा बांबींच्या व्यतिरिक्त संबंधित विभागात ज्या खेळाची आवड व परंपरा आहे अशा खेळाच्या प्रशिक्षणासाठी क्रीडा सुविधा प्राधान्याने निर्माण करण्यात याव्यात.

५. उपरोक्त बाबींच्या सर्वसाधारण खर्चाच्या रक्कमा दर्शविण्यात आल्या आहेत. सदर सुविधा व खर्च निर्देशित स्वरुपाचा ( indicative ) असुन त्यामध्ये स्थळपरत्वे बदल करता येईल.

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: CN = Swati Madhukar Nanal, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA
Date: 2022.03.24 12:58:21 +05'30'

**(स्वा.म. नानल)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**परिशिष्ट - ड**

**शासन निर्णय राक्रीधो-२०१९/प्र.क्र.९२/क्रीयुसे-१, दि. २३ मार्च, २०२२ चे सहपत्र**

## विभागीय, जिल्हा व तालुका क्रीडा संकुलामध्ये प्रस्तावित क्रीडा सुविधांबाबत अटी शर्ती

| विभागीय क्रीडा संकुल | क्रीडा सुविधा | अटी व शर्ती |
|---|---|---|
| | खुले प्रेक्षागृहे | • ४०० मी सिंथेटिक धावनपथ ( ड्रेनेज सिस्टिमसह) १० लेन्स सह<br>• खुले प्रेक्षागृह ज्यामध्ये किमान १०,००० लोकांची आसन क्षमता असावी. तसेच प्रेक्षक गॅलरीवर रूफींग असावे. या प्रेक्षागृहामध्ये स्टेजची देखील कायमस्वरूपी व्यवस्था असावी जेणेकरून वेळोवेळी आयोजित होणा-या कार्यक्रमांचे वेळी वारंवार स्टेज उभारणी करिता होणारा खर्च टाळता येणे शक्य होईल.<br>• कार्यालयीन इमारत - यामध्ये मिटींग हॉल, स्टोअर रूम कार्यालयीन कक्ष, जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र कक्ष, ( आवश्यक त्या प्रमाणात रॅकसह ) मेडिकल रूम / फिजिओथेरिपिस्ट रूम ( attach Bathroom & Toilets ) |
| | जलतरण तलाव | • ऑलम्पिक आकारमानाचा जलतरण तलाव ( ५० मी. x २१ मी.), डायव्हींग पुल व अद्यावत फिल्ट्रेशन प्लॅन्ट, व किमान १००० प्रेक्षकांची आसन क्षमता.<br>• बहुतांशी ठिकाणी सुमारे आठ ते दहा वर्ष शुध्दीकरण यंत्रणा,जलतरण तालावा आतील टाईल्स,डेकटाईल्स बसवण्यात आली असुन आवश्यकता असल्यास सदर दुरुस्त करण्यात याव्यात. |
| | बंदिस्त प्रेक्षागृह | • बहुउद्देशिय इनडोअर हॉल - ५०x४०x८ मी. आकाराचे वुडन फ्लोरिंग / सिंथेटिक फ्लोरिंगसह, ८०० क्षमतेची प्रेक्षक गॅलरी असावी यापुर्वी संकुलामध्ये सदर सुविधा विकसीत केली असल्यास पुनश्च बहुउदेशिय हॉल बांधकाम करण्यात येऊ नये.<br>• बहूउदेशिय हॉलाच्या दुरुसत्या वुडपन फ्लोरिंग क्रीडा बाबीच्या अनुषंगाने वापरण्यासाठी दुरुस्त करणे त्यावर बॅडमिंटन वोहा कोर्ट करणे इ. बाबी ची कामे घेता येतील.<br>• बहुउदेशिय हॉल मध्ये बॅडमिंटन टेबल टेनिस इ.क्रीडा बाबी विचार घेता विद्युत प्रकाश झोत पुरेशा मानकाप्रमाणे (सुमोर १००० लक्स) अशा दृष्टीने अद्यावत विद्युतीकरण करण्यात यावे.<br>• हॉल मध्ये ध्वनिप्रतिबंध व्यवस्था अनुषंगाने सुविधा विकसीत करावी जेणेकरुन प्रती ध्वनी निर्माण होणार नाही. हि तांत्रिक बाब विचार घेऊन सुविधा करण्यात यावी. |
| | ॲस्टोटर्फ हॉकी मैदान | • सिंथेटिक टर्फ हॉकी मैदान (स्प्रिंकलर सिस्टिमसह) स्वच्छतागृह , चेंजिग रुम इ. समावेश असावा. |
| | विविध खेळाचे क्रींडागणे | • विविध खेळांची क्रीडागंणे ( यामध्ये कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, सिंथेटिक सरफेस बास्केटबॉल कोर्ट, सिंथेटिक टेनिस कोर्ट, स्कॅटिग रिंग, हॅण्डबॉल, शुटींग रेंज इ. खेळांचा समावेश करता येईल. याव्यतिरिक्त स्थानिक स्तरावरील लोकप्रिय क्रीडा प्रकारांच्या क्रीडागंणाचा देखील समावेश करता येईल. या क्रीडागंणाकरिता देखील |

| | | |
|---|---|---|
| | | आसन व्यवस्था करण्यात यावी जेणेकरून स्पर्धेच्यावेळी प्रेक्षकांना बसून सामने पाहता येणे शक्य होईल.<br>• कबड्डी, खो-खो, व व्हॉलीबॉल या क्रीडा प्रकारांकरिता रूफींगची ( Roofing ) व्यवस्था करू शकता जेणेकरून पावसाळ्यात देखील अखंड सराव / स्पर्धा घेता येणे शक्य होईल. अशा दृष्टीने सुविधा विकसीत कराव्यात.<br>• फूटबॉल मैदानासह ( लॉन व स्प्रिंकलर सिस्टिमसह )<br>• क्रीडांगणावर विद्युत व्यवस्था आवश्यतेनुसार करण्यात यावी.<br>• ऑलिम्पिक क्रीडा प्रकार विचार घेऊन तसेच स्थानिक स्तरावर खेळ विचारात घेऊन विविध खेळाचे मैदाने संकुल समितीच्या मान्यतेने घेण्यात याव्यात. |
| | आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा साहित्य | • संकुलामध्ये विकसीत करण्यात येत असल्या क्रीडा सुविधा इ. बाबी विचारात घेऊन अद्यावत खेळाचे क्रीडा साहित्य आवश्यकतेनुसार घेण्यात यावे.<br>• क्रीडा साहित्य ज्यामध्ये इतर क्रीडा प्रकारांकरिता आवश्यक साहित्यासोबतच कबड्डी, खो-खो, कुस्ती तायक्वॉदो या क्रीडा प्रकारांकरिता आवश्यक मॅटस उपलब्ध असाव्यात.<br>• जलतरण लेन्स,वॉटर पोलो ,गोल पोस्ट, डायव्हींग बोर्ड,कुस्ती, कबड्डी , खो-खो, ज्युदो मॅट, टेबल टेनिस टेबलस, बॉस्केटबॉल बोर्ड, जिमनॅस्टिक्स व इतर साहित्य स्पर्धा आयोजन प्रशिक्षण, सराव शिबीरे इ. अनुषंगाने संकुलामध्ये असने क्रमप्राप्त आहे. |
| | मुला-मुलींचे वसतीगृह | • क्रीडा संकुलात उपलब्ध होस्टेल इमारतीची क्षमता वाढविणे आणि उपलब्ध खोल्यामध्ये सिंगल / डबल बेड (भोजनकक्ष, फर्निचरसह, स्वच्छ गादी,बेडशिट, लॉकर्स पडदे चादर, उशीसह) सिलिंग फॅन व टेबल खूर्ची व्यवस्था करणे. ऍटॅच टॉयलेट, बाथरूममध्ये शॉवर सिस्टिमसह इ.बाबी विचारात घ्यावात.<br>• विविध क्रीडा स्पर्धेचे वेळी येणा-या खेळाडूंची भोजन व्यवस्था करता येणे शक्य होईल. एकावेळी किमान ५०० खेळाडू बसून भोजन करू शकतील असा हॉल या इमारतीमध्ये असावा. या हॉलमध्ये आवश्यक फर्निचर देखील घेण्यात यावे.<br>• कॅफेटेरिया इमारत किंवा जागा ज्याठिकाणी संकुलामध्ये येणा-या खेळाडू व नागरिकांकरिता हेलदी स्नॅक्स, ज्युस सेंटर इ. उभारणी करता येऊ शकेल. उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण होऊ शकेल. |
| | क्रीडा संकुलातील पाणी पुरवठा व्यवस्था | • खेळाडूंकरिता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी (उदा. पाणपोई / वॉटर कुलर / फिल्टर )<br>• क्रीडा संकुलातील स्वच्छता गृह, क्रीडागंणावर पाण्याची व्यवस्था,झाडे व सुशोभिकरण या बाबी विचार घेऊन पाणी साठा नियमित राहण्यासाठी पाण्याची टाकी विकसीत करावी.<br>• क्रीडा संकुलातील पाणी पुरवठा अनुषंगाने विहिर / विधंन विहिर करून घेण्यात यावी.<br>• क्रीडा संकुलात पाण्याचा स्त्रोत कायम रहावा या उद्देशाने रेन वॉटर हार्वेस्टिंगचा प्रकल्प देखील प्राधान्याने समाविष्ट करण्यात यावा. |

| | | |
|---|---|---|
| | क्रीडा संकुलातील ड्रेनेज व्यवस्था | • क्रीडा संकुलातील पाण्याचे योग्य रितीने निचरा होण्याच्या दृष्टीने सुयोग्य अशी ड्रेनेज व्यवस्था करण्यात यावी. जुन्या ड्रेनेज व्यवस्था चे दुरुस्ती करणे आवश्यक असल्यास दुरुस्ती करण्यात यावी. |
| | क्रीडासंकुलातील विद्युतीकरण | • क्रीडा संकुलात विद्युतीकरण करतांना क्रीडा प्रकाराच्या मानकाप्रमाणे आवश्यक तो प्रकाश झोज क्रीडांगणावर स्पर्धा आयोजना अनुषंगाने असणे गरजेचे आहे.या नुसार विद्युतीकरण करण्यात यावे.<br>• विद्युतदेयकाचा खर्च कमी होण्याच्या दृष्टीने सोलर सिटीम विकसीत करता येईल. |
| | क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते | • क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते व पार्किंग व्यवस्था करण्यात यावी. |
| | क्रीडा संकुलाची संरक्षक भिंत | • संकुलाच्या प्राप्त जागेवर अतिक्रमण होऊ नये यासाठी संरक्षण भिंत करण्यात यावी. |
| | इतर किरकोळ खर्च | • क्रीडागंणाचे जवळ महिला व पुरूषांकरिता स्वतंत्र प्रसाधनगृहे व चेंजिंग रूम्स व्यवस्थाक्रीडा संकुलात अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत निर्माण करण्यासाठी सोलर एनर्जी निर्मित करणारे युनिट बसविण्यात यावे जेणेकरून भविष्यात वीज वापराच्या खर्चात मोठी बचत होऊ शकेल. हॉस्टेलच्या टेरेसवर सोलर रूफींग प्लान्ट केल्यास हॉस्टेलमधील खेळाडूंना गरम पाण्याची सोय करता येईल. ( गिझर व विजेची बचत होईल.) हॉस्टेल / कॅफेटेरियामधील जेवणाचे वेस्ट फूड व्यवस्थापन प्रोजेक्ट करू शकतात.<br>• क्रीडा संकुलाच्या सरंक्षक भिंतीला लागुन तथा मोकल्या जागेत जॉगींग / वॉकिंग ट्रॅक व ओपन जिम / ॲडव्हेचर खेळणी / जेणेकरून क्रीडा संकुलात आरोग्यासाठी फिरायला येणा-या लोकांची व्यवस्था होईल. |

| **जिल्हा क्रीडा संकुल** | **क्रीडा सुविधा** | **अटी व शर्ती** |
|---|---|---|
| | **खुले प्रेक्षागृहे** | • ४०० मी (माती ) धावनपथ ( ड्रेनेज सिस्टिमसह) १० लेन्स असावा यापुर्वी केलेला धावनपथ दुरुस्ती करणे आवश्यक असल्यास तो करण्यात यावा.<br>• ४०० मी धावनपथ (माती), ५००० प्रेक्षकांसाठी गॅलरी, (२००० RCC व ३००० मातीचा भराव), हॉकी/फूटबॉल मैदान,चेजिंग रूम, क्रीडा साहित्यासाठी जागा विकसीत करण्यात यावा.<br>• फूटबॉल मैदानासह ( लॉन व स्प्रिंकलर सिस्टिमसह )<br>• खुले प्रेक्षागृह ज्यामध्ये किमान ५,००० लोकांची आसन क्षमता असावी. तसेच प्रेक्षक गॅलरीवर रूफींग असावे. या प्रेक्षागृहामध्ये स्टेजची देखील कायमस्वरूपी व्यवस्था असावी जेणेकरून वेळोवेळी आयोजित होणा-या कार्यक्रमांचे वेळी वारंवार स्टेज उभारणी करिता होणारा खर्च टाळता येणे शक्य होईल. |
| | **विविध खेळाची क्रीडांगणे** | • व्हॉलीबॉल, बास्केटबॉलची मैदाने, कबड्डी / खो-खो ची २ मैदाने, लॉन टेनिस व लोकप्रिय असलेल्या खेळांची अन्य मैदाने विकसीत करण्यात यावी.<br>• विविध खेळांची क्रीडागंणे ( यामध्ये कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, सिंथेटिक सरफेस बास्केटबॉल कोर्ट, सिंथेटिक |

| | | |
|---|---|---|
| | | टेनिस कोर्ट, स्केंटिग रिंग, हॅण्डबॉल, शुटींग रेंज इ. खेळांचा समावेश करता येईल. याव्यतिरिक्त स्थानिक स्तरावरील लोकप्रिय क्रीडा प्रकारांच्या क्रीडागंणाचा देखील समावेश करता येईल. या क्रीडागंणाकरिता देखील आसन व्यवस्था करण्यात यावी जेणेकरून स्पर्धेच्यावेळी प्रेक्षकांना बसून सामने पाहता येणे शक्य होईल.<br>• कबड्डी, खो-खो, व व्हॉलीबॉल या क्रीडा प्रकारांकरिता रूफींगची ( Roofing ) व्यवस्था करू शकता जेणेकरून पावसाळ्यात देखील अखंड सराव / स्पर्धा घेता येणे शक्य होईल. अशा दृष्टीने सुविधा विकसीत कराव्यात.<br>• क्रीडांगणावर विद्युत व्यवस्था आवश्यतेनुसार करण्यात यावी.<br>• ऑलिम्पिक क्रीडा प्रकार विचार घेऊन तसेच स्थानिक स्तरावर खेळ विचारात घेऊन विविध खेळाचे मैदाने संकुल समितीच्या मान्यतेने घेण्यात याव्यात. |
| | **मल्टिजिम,वेटलिफ्टींग,फिजिकल, एक्सरसाईज हॉल,फिटनेस सेंटर** | • क्रीडा संकुलाच्या सरंक्षक भिंतीला लागुन तथा मोकल्या जागेत जॉगींग / वॉकिंग ट्रॅक व ओपन जिम / ॲडव्हेचर खेळणी / जेणेकरून क्रीडा संकुलात आरोग्यासाठी फिरायला येणा-या लोकांची व्यवस्था होईल. |
| | **जलतरण तलाव** | • ऑलम्पिंक आकारमानाचा जलतरण तलाव ( ५० मी. x २१ मी.), ८ लेन्स सह, अद्यावत फिल्ट्रेशन प्लॅन्ट, चेंजिग रुम विकसीत करण्यात यावी.<br>• बहुतांशी ठिकाणी सुमारे आठ ते दहा वर्ष शुध्दीकरण यंत्रणा,जलतरण तालावा आतील टाईल्स,डेकटाईल्स बसवण्यात आली असुन आवश्यकता असल्यास सदर दुरुस्त करण्यात याव्यात. |
| | **बहुउदेशिय हॉल** | • (मल्टीपरर्पज गेम हॉल) सागवान लाकडाचे फ्लोरिंग / सिंथेटिक फ्लोरिंग / आर्टिफिशियल फ्लोरिंग / लॉन टेनिस सिंथेटिक फ्लोरिंग व हार्ड कोर्ट, शुंटीग रेंज विकसीत करण्यात यावी.<br>• बहुउद्देशिय इनडोअर हॉल - वुडन फ्लोरिंग / सिंथेटिक फ्लोरिंगसह, असावी यापुर्वी संकुलामध्ये सदर सुविधा विकसीत केली असल्यास पुनश्च बहुउदेशिय हॉल बांधकाम करण्यात येऊ नये.<br>• बहूउदेशिय हॉलाच्या दुरुसत्या वुडन फ्लोरिंग फ्लोरिंग क्रीडा बाबीच्या अनुषंगाने वापरण्यासाठी दुरुस्त करणे त्यावर बॅडमिंटन वोहा कोर्ट करणे इ. बाबी ची कामे घेता येतील.<br>• बहुउदेशिय हॉल मध्ये बॅंडमिंटन टेबल टेनिस इ. क्रीडा बाबी विचार घेता विद्युत प्रकाश झोत पुरेशा मानकाप्रमाणे (सुमोर १००० लक्स) अशा दृष्टीने अद्यावत विद्युतीकरण करण्यात यावे.<br>• हॉल मध्ये ध्वनिप्रतिबंध व्यवस्था अनुषंगाने सुविधा विकसीत करावी जेणेकरुन प्रती ध्वनी निर्माण होणार नाही. हि तांत्रिक बाब विचार घेऊन सुविधा करण्यात यावी. |
| | **मुला-मुलीचे वसतीगृह** | • यामध्ये २० बेड मुलींसाठी आवश्यक. शक्यतो डॉरमेंटरी टाईप असावे. (भोजनकक्ष,फर्निचरसह,बेड,चादर, पडदे, बेडशिट, लॉकर्स इ.बाबी विचारात घ्यावात.)<br>• क्रीडा संकुलात उपलब्ध होस्टेल इमारतीची क्षमता वाढविणे आणि उपलब्ध खोल्यामध्ये सिंगल / डबल बेड (भोजनकक्ष, फर्निचरसह, स्वच्छ गादी, बेडशिट, लॉकर्स पडदे चादर, उशीसह) सिलिंग फॅन व टेबल खूर्ची |

| | | |
|---|---|---|
| | | व्यवस्था करणे. ऍट्यॅच टॉयलेट, बाथरूममध्ये शॉवर सिस्टिमसह इ.बाबी विचारात घ्यावात.<br>• विविध क्रीडा स्पर्धेचे वेळी येणा-या खेळाडूंची भोजन व्यवस्था करता येणे शक्य होईल. एकावेळी किमान ३०० खेळाडू बसून भोजन करू शकतील असा हॉल या इमारतीमध्ये असावा. या हॉलमध्ये आवश्यक फर्निचर देखील घेण्यात यावे.<br>• कॅफेटेरिया इमारत किंवा जागा ज्याठिकाणी संकुलामध्ये येणा-या खेळाडू व नागरिकांकरिता हेलदी स्नॅक्स, ज्युस सेंटर इ. उभारणी करता येऊ शकेल. उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण होऊ शकेल. |
| | **खेळाचे साहित्य** | • संकुलामध्ये विकसीत करण्यात येत असल्या क्रीडा सुविधा इ. बाबी विचारात घेऊन अद्यावत खेळाचे क्रीडा साहित्य आवश्यकतेनुसार घेण्यात यावे.<br>• क्रीडा साहित्य ज्यामध्ये इतर क्रीडा प्रकारांकरिता आवश्यक साहित्यासोबतच कबड्डी, खो-खो, कुस्ती तायक्वॉदो या क्रीडा प्रकारांकरिता आवश्यक मॅटस उपलब्ध असाव्यात.<br>• जलतरण लेन्स,वॉटर पोलो ,गोल पोस्ट, कुस्ती, कबड्डी , खो-खो, ज्युदो मॅट, टेबल टेनिस टेबलस, बॉस्केटबॉल बोर्डे, जिमनॅस्टिक्स व इतर साहित्य स्पर्धा आयोजन प्रशिक्षण, सराव शिबीरे इ. अनुषंगाने संकुलामध्ये असने क्रमप्राप्त आहे. |
| | क्रीडा संकुलातील पाणी पुरवठा व्यवस्था | • खेळाडूंकरिता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी (उदा. पाणपोई / वॉटर कुलर / फिल्टर )<br>• क्रीडा संकुलातील स्वच्छता गृह, क्रीडागंणावर पाण्याची व्यवस्था,झाडे व सुशोभिकरण या बाबी विचार घेऊन पाणी साठा नियमित राहण्यासाठी पाण्याची टाकी विकसीत करावी.<br>• क्रीडा संकुलातील पाणी पुरवठा अनुषंगाने विहिर / विधंन विहिर करून घेण्यात यावी.<br>• क्रीडा संकुलात पाण्याचा स्त्रोत कायम रहावा या उद्देशाने रेन वॉटर हार्वेस्टिंगचा प्रकल्प देखील प्राधान्याने समाविष्ट करण्यात यावा. |
| | क्रीडा संकुलातील ड्रेनेज व्यवस्था | • क्रीडा संकुलातील पाण्याचे योग्य रितीने निचरा होण्याच्या दृष्टीने सुयोग्य अशी ड्रेनेज व्यवस्था करण्यात यावी. जुन्या ड्रेनेज व्यवस्था चे दुरुस्ती करणे आवश्यक असल्यास दुरुस्ती करण्यात यावी. |
| | क्रीडासंकुलातील विद्युतीकरण | • क्रीडा संकुलात विद्युतीकरण करतांना क्रीडा प्रकाराच्या मानकाप्रमाणे आवश्यक तो प्रकाश झोज क्रीडांगणावर स्पर्धा आयोजना अनुषंगाने असणे गरजेचे आहे.या नुसार विद्युतीकरण करण्यात यावे.<br>• विद्युतदेयकाचा खर्च कमी होण्याच्या दृष्टीने सोलर सिटीम विकसीत करता येईल. |
| | क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते | • क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते व पार्किंग व्यवस्था करण्यात यावी. |
| | क्रीडा संकुलाची संरक्षक भिंत | • संकुलाच्या प्राप्त जागेवर अतिक्रमण होऊ नये यासाठी संरक्षण भिंत करण्यात यावी. |
| | **इतर किरकोळ खर्च** | • क्रीडागंणाचे जवळ महिला व पुरूषांकरिता स्वतंत्र प्रसाधनगृहे व चेंजिंग रूम्स व्यवस्थाक्रीडा संकुलात अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत निर्माण करण्यासाठी सोलर एनर्जी निर्मित करणारे युनिट बसविण्यात यावे जेणेकरून भविष्यात वीज वापराच्या खर्चात मोठी बचत होऊ शकेल. हॉस्टेलच्या टेरेसवर सोलर रूफींग प्लान्ट केल्यास |

| | | |
|---|---|---|
| | | हॉस्टेलमधील खेळाडूंना गरम पाण्याची सोय करता येईल. ( गिझर व विजेची बचत होईल.) हॉस्टेल / कॅफेटेरियामधील जेवणाचे वेस्ट फूड व्यवस्थापन प्रोजेक्ट करू शकतात.<br>• कार्यालयीन इमारत - यामध्ये मिटींग हॉल, स्टोअर रूम कार्यालयीन कक्ष, जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र कक्ष, ( आवश्यक त्या प्रमाणात रॅकसह ) मेडिकल रूम / फिजिओथेरिपिस्ट रूम ( attach Bathroom & Toilets ) |

| **तालुका क्रीडा संकुल** | **क्रीडा सुविधा** | **अटी व शर्ती** |
|---|---|---|
| | **२००/४०० मी धावनपथ** | • २००/४०० मी. धावनपथ ( ड्रेनेज सिस्टिमसह ) विकसीत करण्यात यावा. यापुर्वी केलेला धावनपथ दुरुस्ती करणे आवश्यक असल्यास तो करण्यात यावा. |
| | **इनडोअर गेम हॉल (बहुउदेशिय हॉल)** | • बहुउद्देशिय इनडोअर हॉल ( सिंथेटिक सरफेस सह / रोलेबल मॅट / वुडन कोर्ट ) तसेच किमान २०० प्रेक्षकांच्या आसन व्यवस्थेसह<br>• बहुउद्देशिय इनडोअर हॉल - वुडन फ्लोरिंग / सिंथेटिक फ्लोरिंगसह, असावी यापुर्वी संकुलामध्ये सदर सुविधा विकसीत केली असल्यास पुनश्च बहुउदेशिय हॉल बांधकाम करण्यात येऊ नये.<br>• बहूउदेशिय हॉलाच्या दुरुसत्या वुडन फ्लोरिंग फ्लोरिंग क्रीडा बाबीच्या अनुषंगाने वापरण्यासाठी दुरुस्त करणे त्यावर बॅडमिंटन वोहा कोर्ट करणे इ. बाबी ची कामे घेता येतील.<br>• बहुउदेशिय हॉल मध्ये बँडमिंटन टेबल टेनिस इ.क्रीडा बाबी विचार घेता विद्युत प्रकाश झोत पुरेशा मानकाप्रमाणे (सुमोर १००० लक्स) अशा दृष्टीने अद्यावत विद्युतीकरण करण्यात यावे.<br>• हॉल मध्ये ध्वनिप्रतिबंध व्यवस्था अनुषंगाने सुविधा विकसीत करावी जेणेकरुन प्रती ध्वनी निर्माण होणार नाही. हि तांत्रिक बाब विचार घेऊन सुविधा करण्यात यावी. |
| | **विविध खेळाचे क्रीडांगणे** | • संकुलात (अ) खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉलची प्रत्येकी २ मैदाने ) ,(ब) बास्केटबॉल कोर्ट / लॉनटेनिस वा अन्य सुविधा / शुंटीग रेंज<br>• विविध खेळांची क्रीडागंणे ( यामध्ये कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, टेनिस इ. खेळांचा समावेश करता येईल. याव्यतिरिक्त स्थानिक स्तरावरील लोकप्रिय क्रीडा प्रकारांच्या क्रीडागंणाचा देखील समावेश करता येईल.<br>• कबड्डी, खो-खो, व व्हॉलीबॉल या क्रीडा प्रकारांकरिता रूफींगची ( Roofing ) व्यवस्था करू शकता जेणेकरून पावसाळ्यात देखील अखंड सराव / स्पर्धा घेता येणे शक्य होईल.<br>• क्रीडांगणावर विद्युत व्यवस्था आवश्यतेनुसार करण्यात यावी. |

| | | |
|---|---|---|
| | | • ऑलिम्पिक क्रीडा प्रकार विचार घेऊन तसेच स्थानिक स्तरावर खेळ विचारात घेऊन विविध खेळाचे मैदाने संकुल समितीच्या मान्यतेने घेण्यात याव्यात. |
| | **कार्यालयीन इमारत** | • कार्यालयीन इमारत - यामध्ये मिटींग हॉल, स्टोअर रूम ( आवश्यक त्या प्रमाणात रॅकसह ) कार्यालयीन कक्ष, मेडिकल रूम ( attach Bathroom & Toilets ) |
| | **क्रीडा साहित्य** | • संकुलामध्ये विकसीत करण्यात येत असल्या क्रीडा सुविधा इ. बाबी विचारात घेऊन अद्यावत खेळाचे क्रीडा साहित्य आवश्यकतेनुसार घेण्यात यावे. |
| | **क्रीडा संकुलातील पाणी पुरवठा व्यवस्था** | • खेळाडूंकरिता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी (उदा. पाणपोई / वॉटर कुलर / फिल्टर )<br>• क्रीडा संकुलातील स्वच्छता गृह, क्रीडागंणावर पाण्याची व्यवस्था,झाडे व सुशोभिकरण या बाबी विचार घेऊन पाणी साठा नियमित राहण्यासाठी पाण्याची टाकी विकसीत करावी.<br>• क्रीडा संकुलातील पाणी पुरवठा अनुषंगाने विहिर / विधंन विहिर करून घेण्यात यावी.<br>• क्रीडा संकुलात पाण्याचा स्त्रोत कायम रहावा या उद्देशाने रेन वॉटर हार्वेस्टिंगचा प्रकल्प देखील प्राधान्याने समाविष्ट करण्यात यावा. |
| | **क्रीडा संकुलातील ड्रेनेज व्यवस्था** | • क्रीडा संकुलातील पाण्याचे योग्य रितीने निचरा होण्याच्या दृष्टीने सुयोग्य अशी ड्रेनेज व्यवस्था करण्यात यावी. जुन्या ड्रेनेज व्यवस्था चे दुरुस्ती करणे आवश्यक असल्यास दुरुस्ती करण्यात यावी. |
| | **क्रीडा संकुलातील विद्युतीकरण** | • क्रीडा संकुलात विद्युतीकरण करतांना क्रीडा प्रकाराच्या मानकाप्रमाणे आवश्यक तो प्रकाश झोज क्रीडांगणावर स्पर्धा आयोजना अनुषंगाने असणे गरजेचे आहे.या नुसार विद्युतीकरण करण्यात यावे.<br>• विद्युतदेयकाचा खर्च कमी होण्याच्या दृष्टीने सोलर सिटीम विकसीत करता येईल |
| | **क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते** | • क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्ते व पार्किंग व्यवस्था करण्यात यावी. |
| | **क्रीडा संकुलाची संरक्षक भिंत** | • संकुलाच्या प्राप्त जागेवर अतिक्रमण होऊ नये यासाठी संरक्षण भिंत करण्यात यावी. |
| | **इतर किरकोळ खर्च** | • क्रीडागंणाचे जवळ महिला व पुरूषांकरिता स्वतंत्र प्रसाधनगृहे व चेंजिंग रूम्स व्यवस्थाक्रीडा संकुलात अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत निर्माण करण्यासाठी सोलर एनर्जी निर्मित करणारे युनिट बसविण्यात यावे जेणेकरून भविष्यात वीज वापराच्या खर्चात मोठी बचत होऊ शकेल.<br>• जागेच्या अभावी विविध खेळांच्या क्रीडागंणाकरिता उपलब्ध खुली जागा समतोल करून त्यावर बहुउद्देशिय मैदान तयार करावी (आवश्यकता असल्यास) |

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: CN = Swati Madhukar Nanal, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA
Date: 2022.03.24 12:58:44 +05'30'

**(स्वा.म. नानल)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**